महाराष्ट्र शासन

**विधि व न्याय विभाग**

**सन १९६८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८**

# महात्मा फुले वस्तुसंग्रहालय, पुणे अधिनियम, १९६८

( ३० सप्टेंबर, २०११ पर्यंत सुधारित )

**The Maharashtra Act No. XVIII of 1968**

# The Mahatma Phule Vastu Sangrahalaya, Pune Act, 1968

*( As modified upto 30th Sept., 2011 )*

*

व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार, कोल्हापूर यांच्याकडून भारतात मुद्रित आणि संचालक, शासन मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशने, महाराष्ट्र शासन, मुंबई-४०० ००४ यांच्याद्वारे प्रकाशित.

२०१३

[किंमत रु. ७.००]

# महात्मा फुले वस्तुसंग्रहालय, पुणे अधिनियम, १९६८

## (सन १९६८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८)

## अनुक्रमणिका


उद्देशिका

| कलमे | | | | पृष्ठे |
|---|---|---|---|---|
| | **प्रारंभिक** | | | |
| १. | संक्षिप्त नाव व प्रारंभ. | .. | .. | १ |
| २. | व्याख्या. | .. | .. | १ |
| | **उद्दिष्टे व सदस्यत्व** | | | |
| ३. | साध्ये व उद्दिष्टे. | .. | .. | १ |
| ४. | संग्रहालयाचे सदस्य. | .. | .. | २ |
| ५. | संग्रहालयाच्या सदस्याच्या अधिमंडळाची सभा | .. | .. | ३ |
| | **विश्वस्त मंडळ** | | | |
| ६. | मंडळाची रचना. | .. | .. | ३ |
| ७. | पदावधी. | .. | .. | ५ |
| ८. | गणपूर्ती. | .. | .. | ६ |
| ९. | पद रिकामे होणे इत्यादींमुळे मंडळाने केलेल्या कृती विधिअग्राह्य न होणे. | .. | .. | ६ |
| १०. | समित्या नेमण्याचा अधिकार. | .. | .. | ६ |
| ११. | मंडळामध्ये विश्वस्तव्यवस्था म्हणून निहित असलेली मालमत्ता. | .. | .. | ६ |
| १२. | संग्रहालयातील वस्तू उसनवार देणे, त्यांची अदलाबदल करणे, त्या विकणे, भेटीदाखल देणे किंवा त्या नष्ट करणे यासंबंधातील मंडळाचे अधिकार. | .. | .. | ६ |
| १३. | मंडळाचे आणखी अधिकार. | .. | .. | ७ |
| १४. | कर्ज काढण्याचा मंडळाचा अधिकार. | .. | .. | ७ |
| १५. | उपविधी करण्याचा मंडळाचा अधिकार. | .. | .. | ७ |
| | **सचिव व कर्मचारीवर्ग** | | | |
| १६. | सचिव व कर्मचारीवर्ग. | .. | .. | ८ |
| १७. | मंडळाचे अधिकारी व कर्मचारी हे लोकसेवक असणे. | .. | .. | ८ |
| | **संकीर्ण** | | | |
| १८. | पुणे शहर महानगरपालिकेकडून अंशदान. | .. | .. | ८ |
| १९. | खर्च. | .. | .. | ८ |
| २०. | लेखापरीक्षा. | .. | .. | ८ |
| २१. | संग्रहालयाची तपासणी. | | .. | ८ |
| २२. | नियम. | .. | .. | ९ |
| | **निरसन व संक्रमणकालीन तरतुदी** | | | |
| २३. | निरसन व व्यावृत्ती. | .. | .. | १० |


----------

## सन १९६८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८ [१]

# महात्मा फुले वस्तुसंग्रहालय, पुणे अधिनियम, १९६८

**[ ११ जून, १९६८ ]**

**या अधिनियमात पुढील अधिनियमान्वये सुधारणा करण्यात आली.**

**सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६३.**

**सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ (१९ मे, २००५)***

**पुणे येथील संग्रहालयाच्या कार्याची महात्मा फुले वस्तुसंग्रहालय, पुणे या नावाखाली व्याप्ती वाढविण्यासाठी आणि त्याचे व्यवस्थापन व परिरक्षण याकरिता अधिक चांगली तरतूद करण्यासाठी अधिनियम.**

**ज्याअर्थी,** पुणे येथील लॉर्ड रे महाराष्ट्र औद्योगिक संग्रहालय, म्हणून सध्या ओळखण्यात येणाऱ्या संग्रहालयाच्या कार्याची व्याप्ती वाढविणे आणि त्याचे महात्मा फुले वस्तुसंग्रहालय, पुणे असे पुन्हा नामकरण करणे आणि त्याचे व्यवस्थापन व परिरक्षण याकरिता अधिक चांगली तरतूद करणे आणि उपरोक्त प्रयोजनांशी संबंधित बाबींची तरतूद करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** याद्वारे, भारतीय गणराज्याच्या एकोणिसाव्या वर्षी , पुढीलप्रमाणे अधिनियमित करण्यात येत आहे :—

### प्रारंभिक

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महात्मा फुले वस्तुसंग्रहालय, पुणे अधिनियम, १९६८ असे म्हणावे.

(२) तो, राज्य शासन **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नेमील अशा **तारखेस** [२] अंमलात येईल.

व्याख्या

**२.** संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर, या अधिनियमात—

(अ) ''मंडळ'' म्हणजे, या अधिनियमान्वये रचना करण्यात आलेले किंवा रचना करण्यात आल्याचे मानण्यात आलेले विश्वस्त मंडळ ;

(ब) ''विहित'' म्हणजे या अधिनियमान्वये केलेल्या नियमांद्वारे विहित केलेले ;

(क) ''संग्रहालय'' म्हणजे महात्मा फुले वस्तुसंग्रहालय, पुणे.

### उद्दिष्टे व सदस्यत्व

साध्ये व उदिष्टे

**३.** (१) संग्रहालयाची साध्ये व उद्दिष्टे पुढीलप्रमाणे असतील :--

(अ) पुढील गोष्टी सोदाहरण स्पष्ट करण्याच्या दृष्टीने, सर्वसाधारण लोकांस शिक्षण देणारी परिसंस्था म्हणून काम करणे :--

(एक) विविध विज्ञान शाखा अणि विशेषतः उद्योग, शेती व वाणिज्य यांच्या बाबतीत त्यांचे उपयोजन ;

---

१. उद्दिष्टे व कारणे यांच्या निवेदनासाठी, ''महाराष्ट्र शासन राजपत्र,'' १९६८, भाग पाच, अतिरिक्त पृष्ठ ९१ (इंग्रजी) पहा.

* अधिनियमाच्या प्रारंभाचा दिनांक दर्शविते.

२. १५ ऑगस्ट १९६८, पहा : शासकीय अधिसूचना, शिक्षण व समाज कल्याण विभाग, क्रमांक एमएसएम १६६५-क्यू, दिनांक १९ जुलै, १९६८.

(दोन) महाराष्ट्राचा इतिहास, कला, सांस्कृतिक कार्य आणि सामाजिक व आर्थिक विकास आणि त्याचा उर्वरित भारताशी व इतर देशांशी असलेला संबंध ;

(ब) विज्ञानाच्या प्रत्येक शाखेचा उगम, विकास आणि तिचा आधुनिक उपयोग व तिचे उद्योग, शेती व व्यापार यांच्या संबंधात उपयोजन, या गोष्टी, प्रदर्शनीय वस्तू, यंत्रे, प्रतिकृती, चित्रे व नकाशे यांच्या सहाय्याने दाखविणे ;

(क) प्रदर्शनीय वस्तू, प्राचीन स्मारके व स्मारकांचे अवशेष, देवतांच्या मूर्ती, नाणी, युध्दाची हत्यारे, वाद्ये, धार्मिक किंवा सामाजिक समारंभातून वापरली गेलेली पात्रे व भांडी, स्थानिक कला व वस्तुनिर्मितीची उपकरणे व अशा इतर संबंधित वस्तू याच्या सहाय्याने व त्याचबरोबर संग्रहातील वस्तूंचे आकलन व अर्थविवरण होण्यास पूरक होईल असे इतर संग्रह, यांच्या सहाय्याने व आवश्यक तेथे भारताच्या इतर भागांतील तशाच प्रकारच्या वस्तुशी किंवा जिनसांशी असलेले त्यांचे संबंध दाखवणाऱ्या वस्तुसंग्रहाद्वारे महाराष्ट्राचा इतिहास, कला, संस्कृती, जीवनमान व जीवनपध्दती, नैसर्गिक साधनसंपत्ती, उद्योग, शेती व महाराष्ट्राचा सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक विकास यांचे दर्शन घडविणे.

(ड) चलचित्रपट, दीपचित्रे छायाचित्रे यांचा अंतर्भाव असलेले ग्रंथालय चालविणे ;

(ई) महाराष्ट्राचा औद्योगिक विकास व इतिहास, कला, सांस्कृतिक कार्य व सामाजिक आणि आर्थिक विकास यासंबंधात स्वारस्य निर्माण करण्याच्या हेतूने व्याख्याने आयोजित करणे, प्रात्यक्षिके करून दाखविणे व दौरे काढणे ;

(फ) वरील खंड (अ) ते (क) मध्ये नमूद करण्यात आलेल्या बाबींच्या संबंधात औद्योगिक व इतर प्रदर्शने भरविणे व ती भरविण्याच्या कामी सहाय्य करणे ;

(ग) वाणिज्यिक विक्रयालय स्थापन करणे व ती स्थापन करण्याच्या कामी सहाय्य करणे ;

(ह) विशेषकरुन महाराष्ट्रातील व सर्वसाधारणपणे भारतातील उद्योग व हस्तव्यवसाय यांच्या उत्पादित वस्तू लोकप्रिय करणे ;

(आय) उपरोक्तपैकी कोणतीही साध्ये किंवा उद्दिष्टे साध्य करण्यासाठी आवश्यक असतील किंवा सहाय्यभूत होतील अशी सर्व कामे व अशा सर्व गोष्टी हाती घेणे व करणे.

(२) संग्रहालयात ''लॉर्ड रे औद्योगिक विभाग'' या नावाने संबोधला जाणारा एक स्वतंत्र औद्योगिक विभाग असेल.

संग्रहालयाचे सदस्य

**४.** (१) संग्रहालयाच्या सदस्यांत पुढील वर्गातील सदस्यांचा अंतर्भाव असेल.

(एक) हितकर्ते म्हणजे, जे रु. १,००,००० किंवा त्याहून अधिक रक्कम रोख किंवा अन्य स्वरुपात देतील, किंवा ज्यांनी ती आधीच दिलेली असेल असे सदस्य ;

(दोन) सहयोगी सदस्य म्हणजे, जे रु. २५,००० किंवा त्यापेक्षा अधिक, परंतु रु. १,००,००० पेक्षा कमी रक्कम, रोख किंवा अन्य स्वरुपात देतील किंवा ज्यांनी ती आधीच दिलेली असेल असे सदस्य ;

(तीन) आश्रयदाते म्हणजे, जे रु. ५,००० किंवा त्यापेक्षा अधिक परंतु, २५,००० रुपयांपेक्षा कमी रक्कम, रोख किंवा अन्य स्वरुपात देतील किंवा ज्यांनी ती आधीच दिलेली असेल असे सदस्य ;

(चार) आजीव सदस्य म्हणजे, जे रु. ५०० किंवा त्यापेक्षा अधिक परंतु रुपये ५,००० पेक्षा कमी असेल अशी रक्कम एक रकमी देतील किंवा ज्यांनी ती आधीच दिलेली असेल असे सदस्य ;

(पाच) देणगीदार म्हणजे, जे रु. १०० किंवा त्यापेक्षा अधिक परंतु रु. ५०० पेक्षा कमी असेल अशी रक्कम एक रकमी देतील किंवा ज्यांनी ती आधीच दिलेली असेल असे सदस्य ;

(सहा) साधारण सदस्य म्हणजे, जे दरसाल रु. १० इतकी रक्कम देतील असे सदस्य :

परंतु हितकर्ता, सहयोगी सदस्य किंवा आश्रयदाता होण्याची इच्छा असलेल्या व्यक्तीच्या बाबतीत, आवश्यक ती रक्कम रोख देण्याचे त्यांनी योजिले असेल तर, ती एकरकमी किंवा पहिला हप्ता दिल्याच्या तारखेपासून २ वर्षांपेक्षा जास्त नसेल अशा कालावधीत, पाच पेक्षा अधिक नसतील इतक्या हप्त्यांत, मंडळास देय असेल, आणि देणगी रोख रकमेत न देता अन्य प्रकारे देण्याचे योजिले असेल तर, मंडळास कोणतेही कारण न देता, देणगी म्हणून देण्याचे योजिलेल्या प्रदर्शनीय वस्तू किंवा सामग्री स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा आणि त्यांचे मूल्य ठरविण्याचा आणि देणगीदाराला सदस्यत्वाचा योग्य तो वर्ग नेमून देण्याचा अधिकार असेल मात्र देऊ केलेली भेट मंडळाने ज्या तारखेला स्वीकारली असेल त्या तारखेपासून, दोन वर्षांच्या, कालावधीच्या आत, सर्व प्रदर्शनीय वस्तू किंवा सामग्री मंडळाच्या स्वाधीन करण्यात आलेली असली पाहिजे.

(२) कोणत्याही व्यक्तीला तिचा धर्म, वंश, जात, लिंग किंवा जन्मस्थान या कारणावरून संग्रहालयाचा सदस्य होण्यास मनाई करण्यात येणार नाही.

**५.** मंडळ संग्रहालयाच्या सदस्यांच्या अधिमंडळाची बैठक, दरवर्षी विहित करण्यात येईल अशा वेळी आणि अशा ठिकाणी बोलावील. संग्रहालयाच्या सदस्यांच्या अधिमंडळाची बैठक.

## विश्वस्त मंडळ

**६.** (१) संग्रहालयाचे परिरक्षण व व्यवस्थापन यासाठी आणि या अधिनियमाची इतर प्रयोजने पार पाडण्यासाठी एका विश्वस्त मंडळाची रचना करण्यात येईल. असे मंडळ, '' महात्मा फुले वस्तुसंग्रहालय, पुणे यांचे विश्वस्त'' या नावाचा एक निगम निकाय असेल, आणि त्याची अखंड अधिकार परंपरा व एक सामान्य मुद्रा असेल आणि त्यास मालमत्ता संपादन करण्याचा, ती धारण करण्याचा आणि तिची विल्हेवाट करण्याचा अधिकार असेल व त्याला संविदा करण्याचा अधिकार असेल ; व त्या नावाने त्याला आणि त्याच्यावर दावा लावता येईल. मंडळाची रचना.

(२) मंडळ पुढील सदस्यांचे मिळून बनलेले असेल—

**(अ)** पुढील पदसिध्द सदस्य—

(एक) महसूल आयुक्त, पुणे विभाग, हा मंडळाचा अध्यक्ष असेल ;

(दोन) कला संचालक ;

[१] [ (तीन) संचालक, पुरातत्वशास्त्र व वस्तुसंग्रहालय ;]

---

१. सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६३ याच्या कलम २ अन्वये खंड (तीन) बदली दाखल करण्यात आला.

(चार) शिक्षण संचालक आणि जर तो उपस्थित राहू शकत नसेल तर, शिक्षण उप संचालकापेक्षा कमी दर्जाची नसेल अशी त्याची नामनिर्देशित व्यक्ती ;

(पाच) कृषिसंचालक, अणि जर तो उपस्थित राहू शकत नसेल तर, कृषि उप संचालकापेक्षा कमी दर्जाची नसेल अशी त्याची नामनिर्देशित व्यक्ती ;

(सहा) मुख्य वनसंरक्षक, आणि जर तो उपस्थित राहू शकत नसेल तर, वनसंरक्षकापेक्षा कमी दर्जाची नसेल अशी त्याची नामनिर्देशित व्यक्ती ;

(सात) उद्योग आयुक्त, आणि जर तो उपस्थित राहू शकत नसेल तर, उद्योग उप संचालकापेक्षा कमी दर्जाची नसेल अशी त्याची नामनिर्देशित व्यक्ती ;

(आठ) अधीक्षक, पुरातत्वशास्त्रीय सर्वेक्षण, दक्षिण-पश्चिम मंडल. ;

**(ब)** [१] [ (एक) महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सभापतीनी नामनिर्देशित केलेला पुणे जिल्ह्यात राहणारा, महाराष्ट्र विधानपरिषदेचा एक सदस्य ;

(दोन) महाराष्ट्र विधानसभेच्या अध्यक्षांनी नामनिर्देशित केलेला पुणे जिल्ह्यात राहणारा, महाराष्ट्र विधानसभेचा एक सदस्य ;

**(क)** पुणे शहराच्या महानगरपालिकेचे पुढील चार प्रतिनिधी—

पदसिध्द—

(एक) महापौर, हा मंडळाचा सभापती असेल ;

(दोन) नगरपालिका आयुक्त ;

(तीन) सभापती, स्थायी समिती ;

(चार) सभापती, नगरपालिका शिक्षण मंडळ.

**(ड)** विहित करण्यात येतील असे स्थानिक संस्थांकडून नामनिर्देशित करण्यात आलेले, स्थानिक संस्थाचे (पुणे शहराची महानगरपालिका सोडून) प्रतिनिधी ; मात्र अशा प्रत्येक स्थानिक संस्थेने, विहित करण्यात येईल अशी रक्कम, संग्रहालयाच्या निधीत अंशदान म्हणून देण्याचे कबूल केले पाहिजे.

**(ई)** संग्रहालयाच्या सदस्यांचे प्रतिनिधी पुढीलप्रमाणे :--

(एक) हितकर्त्यांच्या वर्गातील सर्व व्यक्ती ;

(दोन) विहित रीतीने निवडून दिलेला, सहयोगी सदस्यांचा एक प्रतिनिधी ;

(तीन) सदस्यांच्या उर्वरित वर्गातून विहित रीतीने निवडून दिलेले चार प्रतिनिधी :

परंतु, संग्रहालयाचा कोणताही सर्वसाधारण सदस्य हा, तीन वर्षांपेक्षा कमी नसेल इतक्या कालावधीसाठी असा सदस्य असल्याखेरीज, प्रतिनिधी म्हणून निवडून येण्यास पात्र असणार नाही.

---

१. सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ याच्या कलम ५ द्वारे खंड (एक) व (दोन) दाखल करण्यात आले.

**(फ)** स्थानिक वाणिज्य व उद्योग यात स्वारस्य असलेले दोन प्रतिनिधी, यापैकी एक डेक्कन ॲग्रिकल्चरल असोसिएशन, पुणे या संस्थेने नामनिर्देशित करावयाचा असेल व दुसरा मराठा चेंबर ऑफ कॉर्मस अँड इंडस्ट्रीज, पुणे या संस्थेने नामनिर्देशित करावयाचा असेल :

परंतु, संबंधित संस्थेने, संग्रहालयाच्या निधीत रु. ३०० इतकी संलग्नीकरण फी देईतोपर्यंत तिला या खंडान्वये कोणताही प्रतिनिधी नामनिर्देशित करता येणार नाही किंवा अशा संस्थेने उक्त निधीस रु. १०० इतकी वार्षिक वर्गणी विहित कालावधीत दिलेली असल्याखेरीज त्या प्रतिनिधीला सदस्य म्हणून राहता येणार नाही.

**(ग)** (एक) संचालक, प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियम ऑफ वेस्टर्न इंडिया, मुंबई ;

(दोन) पुणे विद्यापीठाच्या प्राचीन भारतीय संस्कृती विभागाचा प्रभारी प्राध्यापक ;

**(ह)** इतिहास, कला, पुरातत्वशास्त्र, मानवशास्त्र किंवा संग्रहालयातील संग्रहाशी संबंधित इतर विषय यांमध्ये शासनाच्या मते तज्ज्ञ असलेला किंवा त्याचे विशेष ज्ञान असलेला राज्य शासनाकडून नामनिर्देशित करण्यात आलेला एक अशासकीय प्रतिनिधी,

(३) मंडळास, तीनपेक्षा अधिक नसतील इतके सदस्य उक्त मंडळ ठरवील त्याप्रमाणे प्रत्येकी तीन वर्षांपेक्षा अधिक नसेल अशा कालावधीकरिता, स्वीकृत करून घेता येतील.

**७.** (१) महाराष्ट्र विधानपरिषद व विधानसभा यांचे प्रतिनिधित्व करणारे सदस्य ते जोवर, यथास्थिति, उक्त परिषद किंवा सभा यांचे सदस्य असतील तोवर, अधिकारपद धारण करतील. हितकर्ते, तहहयात अधिकारपद धारण करतील. अन्यथा तरतूद करण्यात आली असेल त्याखेरीज इतर सदस्य (पदसिद्ध सदस्य वगळून) तीन वर्षांच्या कालावधीकरिता अधिकारपद धारण करतील. पदावधी

(२) निवडून दिलेला किंवा नामनिर्देशित केलेला सदस्य—

(अ) मृत्यू पावला किंवा नादार झाला, अथवा

(ब) मंडळाच्या लागोपाठच्या सहापेक्षा अधिक बैठकींना अनुपस्थित राहिला, अथवा

(क) लागोपाठ सहापेक्षा अधिक महिने महाराष्ट्र राज्यात अनुपस्थित राहण्याच्या उद्देशाने राज्यातून निघून गेला, अथवा

(ड) त्याने कार्यमुक्त होण्याची इच्छा व्यक्त केली, अथवा

(ई) काम करण्याचे नाकारले किंवा काम करण्यास असमर्थ झाला.

तर त्याच्या जागी नवीन सदस्य, यथास्थिति, निवडून देण्यात किंवा नामनिर्देशित करण्यात येईल व तो ज्या सदस्याच्या जागी निवडून देण्यात किंवा नामनिर्देशित करण्यात येणार असेल तो सदस्य ज्या रीतीने निवडून देण्यात किंवा नामनिर्देशित करण्यात आला असेल त्याच रीतीने निवडून देण्यात किंवा नामनिर्देशित करण्यात येईल आणि जागा रिकामी झाली नसती तर अशा सदस्याने ज्या कालावधीपर्यंत अधिकार पद धारण केले असते, त्याच कालावधीपर्यंत असा नवीन सदस्य अधिकारपद धारण करील.

गणपूर्ती

**८.** (१) जेव्हा मंडळाची एखादी बैठक घेण्यात येईल तेव्हा आयुक्त, पुणे विभाग, आणि त्याच्या अनुपस्थितीत, मंडळाचा सभापती आणि या दोहोंच्या अनुपस्थितीत, जो शासकीय अधिकारी असेल आणि बैठकीला उपस्थित असलेल्या सदस्यांकडून जो निवडून देण्यात आला असेल असा सदस्य, मंडळाच्या बैठकीत अध्यक्ष होईल.

(२) मंडळाच्या बैठकीत कामकाज चालविण्यासाठी गणपूर्तीकरिता आवश्यक असलेली संख्या सात असेल.

पद रिकामे होणे इत्यादीमुळे मंडळाने केलेल्या कृती विधिअग्राह्य न होणे.

**९.** मंडळात एखादे अधिकारपद रिकामे असणे किंवा त्याच्या रचनेत कोणताही दोष असणे, केवळ याच कारणावरून, मंडळाने केलेली कोणतीही कृती विधिअग्राह्य असल्याचे मानण्यात येणार नाही.

समित्या नेमण्याचा अधिकार.

**१०.** मंडळास ह्याबाबतीत केलेल्या कोणत्याही नियमांच्या तरतुदीस अधीन राहून, बैठकीमध्ये संमत झालेल्या ठरावाद्वारे, वेळोवेळी,—

(अ) ठरावात विनिर्दिष्ट करण्यात येतील अशी कामे पार पाडण्याकरिता आपल्या सदस्यांच्या समित्या नेमता येतील,

(ब) ठरावात विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा अटींवर आणि अशा विषयांवर (मंडळाला) सल्ला देण्याच्या प्रयोजनाकरिता, अंशतः त्याचे सदस्य व अंशतः इतर व्यक्ती यांच्या मिळून बनलेल्या सल्लागार समित्या नेमता येतील.

मंडळामध्ये विश्वस्त व्यवस्था म्हणून निहित असलेली मालमत्ता.

**११.** या अधिनियमाच्या प्रारंभी जी जंगम किंवा स्थावर मालमत्ता, लॉर्ड रे महाराष्ट्र औद्योगिक संग्रहालय अधिनियम, १९४७ अन्वये रचना करण्यात आलेल्या मंडळाने त्या संग्रहालयाच्या प्रयोजनाकरिता, विश्वस्त व्यवस्था म्हणून धारण केली असेल ती सर्व मालमत्ता तसेच उक्त प्रयोजनांसाठी जी यापुढे देण्यात येईल, मृत्यूपत्राने देण्यात येईल, हस्तांतरित करण्यात येईल किंवा संपादन करण्यात येईल अशी कोणतीही मालमत्ता, यात अंशदाने, फी व वर्गण्या यांचा समावेश होतो, आणि मंडळाने आपले कोणतेही अधिकार वापरल्याच्या परिणामी त्यास उपार्जित झालेली मालमत्ता या कलमाच्या सामर्थ्याने व आणखी कोणत्याही आश्वासनावाचून संग्रहालयाच्या प्रयोजनासाठी, विश्वस्तव्यवस्था म्हणून मंडळाकडे निहित होईल.

सन १९४७ चा मुंबई ३२.

संग्रहातील वस्तू उसनवार देणे, त्यांची अदलाबदल करणे, त्या विकणे, भेटी दाखल देणे किंवा त्या नष्ट करणे. या संबंधातील मंडळाचे अधिकार.

**१२.** याबाबत करण्यात येणारे कोणतेही नियम किंवा उपविधी यांच्या तरतुदींच्या अधीनतेने मंडळास वेळोवेळी पुढील गोष्टी करता येतील :—

(अ) या अधिनियमान्वये मंडळामध्ये निहित असलेल्या कोणत्याही संग्रहात असलेली कोणतीही संपूर्ण वस्तू किंवा तिचा कोणताही भाग कोणत्याही व्यक्तीस उसना देणे ;

(ब) अशा कोणत्याही संग्रहातील वस्तूंची अदलाबदल करणे किंवा त्या विकणे आणि त्यांच्या जागी, मंडळाच्या मते संग्रहालयात जतन करण्यासाठी योग्य असतील अशा इतर वस्तू घेणे किंवा खरेदी करणे ;

(क) अशा कोणत्याही संग्रहातील वस्तू भारतातील किंवा इतर ठिकाणच्या संग्रहालयांना भेटी दाखल देणे ;

(ड) अशा कोणत्याही संग्रहातील कोणतीही वस्तू काढून टाकणे व नष्ट करणे :

परंतु, कोणतीही वस्तू मंडळाने ज्या अटींवर स्वीकारली असेल त्या अटींनुसार ती उसनी देण्यास तिची अदलाबदल करण्यास, ती विकण्यास, भेटी दाखल देण्यास, काढून टाकण्यास किंवा ती नष्ट करण्यास मनाई असेल तर, अशी कोणतीही वस्तू अशा रीतीने उसनी देण्याचा, तिची अदलाबदल करण्याचा, ती विकण्याचा, भेटी दाखल देण्याचा, काढून टाकण्याचा किंवा ती नष्ट करण्याचा प्राधिकार मंडळास या कलमातील कोणत्याही तरतुदीमुळे प्राप्त होणार नाही.

मंडळाचे आणखी अधिकार.

**१३.** मंडळास, या अधिनियमाखालील त्याच्या विश्वस्त व्यवस्थेच्या प्रयोजनांसाठी योग्य वाटल्यास पुढील गोष्टी करता येतील :--

(अ) जे संग्रह मंडळाची मालमत्ता नसतील अशा संग्रहाची अभिरक्षा व व्यवस्था ही आपल्या हाती घेणे आणि असे संग्रह संग्रहालयात किंवा इतरत्र ठेवणे व त्यांचे जतन करणे ;

(ब) याबाबतीत करण्यात आलेल्या नियमांच्या अधीनतेने संग्रहालयातील संग्रहाशी संबंधित असलेल्या सर्व किंवा कोणत्याही विषयाच्या शिक्षणाचे पाठ्यक्रम आयोजित करणे आणि भारतीय उद्योग व हस्तव्यवसाय यांच्या उत्पादनांच्या विक्रीसाठी व प्रदर्शनासाठी सवलती देणे ;

कर्ज काढण्याचा मंडळाचा अधिकार.

**१४.** या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी केलेला किंवा करावयाचा कोणताही परिव्यय, आकार किंवा खर्च भागविण्याच्या प्रयोजनार्थ किंवा मंडळाने यानंतर कर्जाऊ घेतलेल्या किंवा त्याच्याकडून येणे असलेल्या कोणत्याही रकमेची पूर्णतः किंवा भागशः परतफेड करण्यासाठी मंडळास, केंद्र सरकार किंवा राज्य शासन यांच्याकडून किंवा राज्य शासनाच्या पूर्व मंजुरीने, कोणत्याही व्यक्तीकडून वेळोवेळी कर्ज काढता येईल किंवा पुनश्च कर्ज काढता येईल किंवा व्याजावर पैसे घेता येतील.

उपविधी करण्याचा मंडळाचा अधिकार.

**१५.** (१) मंडळाला त्याची विश्वस्तव्यवस्था अंमलात आणण्यासाठी आवश्यक असलेल्या कोणत्याही प्रयोजनासाठी हा अधिनियम किंवा त्या अन्वये केलेले नियम यांच्या तरतुदींशी विसंगत नसतील असे उपविधी राज्य शासनाच्या पूर्व मंजुरीने वेळोवेळी करता येतील.

(२) विशेषकरून आणि पूर्वगामी अधिकारांच्या सर्वसाधारणतेस बाध येऊ न देता, अशा उपविधीत पुढील गोष्टींबाबत तरतूद करता येईल :--

(अ) मंडळाच्या बैठकी बोलाविणे, भरविणे व स्थागित करणे आणि अशा बैठकींमध्ये अनुसरावयाची कार्यपध्दती ;

(ब) अशा बैठकींना विश्वस्त उपस्थित राहण्याची व्यवस्था करणे ;

(क) कार्यवृत्त पुस्तके व लेखा पुस्तके ठेवणे ;

(ड) सभापती व सचिव यांना कलम १९ अन्वये खर्चास ज्या मर्यादांपर्यंत मंजुरी देता येईल त्या मर्यादा ;

(ई) तालिका व मार्गदर्शिका आणि इतर प्रकाशने यांचे संकलन करणे ;

(फ) मंडळाकडे निहित असलेल्या संग्रहातील वस्तू उसन्या देणे ;

(ग) अशा संग्रहात ज्या वस्तू एकापेक्षा जास्त संख्येत असतील त्यातील जास्तीच्या वस्तूंची इतर संग्रहालयांशी अदलाबदल करणे, विक्री करणे किंवा त्या भेट म्हणून देणे ;

(ह) अशा संग्रहातील वस्तू काढून टाकणे व नष्ट करणे ;

(आय) संग्रहालयात प्रवेश देणे याखेरीज इतर प्रयोजनांसाठी फी बसविणे ;

(जे) संग्रहालयाचे सर्वसाधारण व्यवस्थापन ;

**(३)** सर्व उपविधींना मंजुरी देण्यात आल्यानंतर राज्य शासन ते **शासकीय राजपत्रात** प्रसिध्द करील.

### सचिव व कर्मचारीवर्ग

सचिव व कर्मचारीवर्ग

**१६.** संग्रहालयाचा एक संचालक असेल आणि तो मंडळाचा सचिवसुद्धा असेल. मंडळास, या अधिनियमाखालील आपली कर्तव्य कार्यक्षमतेने पार पाडण्याकरिता आवश्यक वाटतील असे इतर अधिकारी व कर्मचारी नेमता येतील. याबाबतीत करण्यात येतील अशा कोणत्याही नियमास अधीन राहून, मंडळ ते नोकरीला ठेवील असा संचालक व इतर कर्मचारीवर्ग यांच्या सेवेच्या अटी व शर्ती निर्धारित करील.

मंडळाचे अधिकारी व कर्मचारी हे लोकसेवक असणे.

**१७.** मंडळाने नेमलेले सर्व अधिकारी व कर्मचारी हे, भारतीय दंड संहितेच्या कलम २१ च्या अर्थानुसार लोकसेवक असल्याचे मानण्यात येईल. सन १८६० चा ४५.

### संकीर्ण

पुणे शहर महानगर पालिकेकडून अंशदान.

**१८.** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९, यात काहीही अंतर्भूत असले तरी, पुणे शहर महानगरपालिका, रु. ७,५०० पेक्षा कमी नसेल इतक्या रुपयांचे वार्षिक अनुदान संग्रहालयाच्या निधीस देईल. सन १९४९ चा मुंबई ५९.

**१९.** (१) सर्व खर्च मंडळाकडून मंजूर करण्यात येतील. मंडळास, त्याच्या उपविधींमध्ये खर्च ठरविण्यात येईल त्या मर्यादेपर्यंत, प्रत्येक महिन्याचा खर्च मंजूर करण्याकरिता सभापती व सचिव यांस वेळोवेळी प्राधिकृत करता येईल. सभापती किंवा सचिव यांनी मंजुरी दिलेली सर्व प्रकरणे मंडळाच्या त्यानंतरच्या बैठकीपुढे संमतीसाठी रीतसर ठेवण्यात येतील.

(२) रक्कम प्रदान करण्यासंबंधीचा प्रत्येक आदेश, सचिवाच्या स्वाक्षरीने व सभापतीच्या प्रतिस्वाक्षरीने अधिप्रमाणित करण्यात येईल.

लेखापरीक्षा.

**२०.** (१) [१][मुख्य लेखापरीक्षक, स्थानिक निधि लेखा] यांनी याबाबतीत नेमलेल्या लेखापरीक्षकाकडून संग्रहालयाच्या लेख्यांची वार्षिक लेखापरीक्षा करण्यात येईल.

(२) सचिव, लेख्यांचे वार्षिक विवरण, आवश्यक त्या प्रमाणकांसह लेखापरीक्षकास पुरवील आणि लेखापरीक्षकास त्याच्या कामात सामान्यतः सहाय्य करील.

(३) लेखापरीक्षकाचा अहवाल मंडळापुढे ठेवण्यात येईल.

संग्रहालयाची तपासणी.

**२१.** राज्य शासनास, ते नेमील अशा एका किंवा अनेक व्यक्तींकडून, संग्रहालयाची आणि त्याच्या इमारतींची, ग्रंथालयातील पुस्तकांची, फर्निचरची व इतर सामग्रीची तपासणी करवून घेण्याचा आणि अशा व्यक्तीने किंवा व्यक्तींनी केलेल्या कोणत्याही शिफारशीवरून, त्यास योग्य वाटेल अशी कृती करण्याविषयी मंडळास निदेश देण्याचा हक्क असेल. मंडळ अशा निदेशांचे अनुपालन करील.

---

१. सन १९७७ च्या महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६३ याच्या कलम ३ अन्वये ''महालेखापाल, महाराष्ट्र'' या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

**२२.** (१) राज्य शासनास मंडळाशी विचारविनियम केल्यानंतर **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाचे उद्देश पार पाडण्यासाठी नियम करता येतील. नियम

(२) विशेषतः आणि पूर्वगामी अधिकाराच्या सर्वसाधारणतेस बाध येऊ न देता, अशा नियमांत पुढील सर्व किंवा कोणत्याही बाबींसाठी तरतूद करता येईल :--

(अ) कलम ५ अन्वये, संग्रहालयाच्या सदस्यांच्या अधिमंडळाची बैठक वर्षभरात ज्यावेळी व ज्या ठिकाणी बोलाविण्यात येईल ती वेळ व ते ठिकाण ;

(ब) पुणे शहराच्या महानगरपालिके व्यतिरिक्त इतर स्थानिक संस्थांच्या प्रतिनिधींची संख्या, खंड (ड) अन्वये त्यांनी द्यावयाची अंशदानाची रक्कम, खंड (ई) अन्वये सदस्यांच्या प्रतिनिधींच्या निवडणुकीची रीत आणि कलम ६, पोट-कलम (२) खंड (फ) च्या परंतुकाअन्वये ज्या कालावधीत वार्षिक वर्गणी देण्यात आली पाहिजे तो कालावधी ;

(क) कलम १० अन्वये मंडळाच्या समित्यांची नेमणूक करणे आणि अशा समित्यांकडे सोपविता येतील अशी कामे किंवा निर्देशित करता येतील अशा बाबी ;

(ड) संग्रहालयाच्या इमारती उभारणे, संग्रहालय इतर कोणत्याही नवीन जागेत नेणे, संग्रहालयाचे परिरक्षण व व्यवस्थापन, कलम १२ आणि कलम १३ चा खंड (ब) याखालील मंडळाच्या अधिकारांचा वापर करणे, संग्रहालयात जमा केलेल्या वस्तुंची काळजी घेणे व त्या अभिरक्षेत ठेवणे आणि ज्या शर्तीवर लोकांना संग्रहालयात प्रवेश देण्यात येईल त्या शर्ती ;

(ई) मंडळाकडे निहित असलेल्या कोणत्याही मालमत्तेचे परिरक्षण, व्यवस्थापन व तिची विल्हेवाट करणे, आणि सरकारी रोख्यांत किंवा अन्यथा गुंतवणूक करणे व (पुन:श्च) गुंतवणूक करणे आणि संग्रहालयाचा निधी सुरक्षित अभिरक्षेत ठेवणे ;

(फ) मंडळाने ज्या नमुन्यांमध्ये लेखे ठेवले पाहिजेत तो नमुना आणि असे लेखे प्रसिध्द करणे ;

(ग) राज्य शासनाच्या नागरी कर्मचाऱ्यांस किंवा अशा नागरी कर्मचाऱ्यांच्या कोणत्याही वर्गास जे नियम लागू असतील ते नियम मंडळाने नोकरीला ठेवलेल्या अधिकाऱ्यांना व कर्मचाऱ्यांना लागू करणे ;

(ह) मंडळाने नोकरीला ठेवलेल्या अधिकाऱ्यांच्या व कर्मचाऱ्यांच्या लाभासाठी मंडळ जो भविष्यनिर्वाह निधी स्थापन करील त्या निधीत मंडळ, वेळोवेळी ठरवील अशा दरांनी व अशा शर्तीस अधीन राहून, अंशदानाच्या रकमा भरणे ;

(आय) ग्रंथालय व वाचनालय यांचे व्यवस्थापन ;

(जे) संग्रहालयात प्रवेश देण्यासाठी बसवावयाची फी ;

(के) विहित करावयाची असेल किंवा विहित करता येईल अशी इतर कोणतीही बाब.

(३) या कलमान्वये केलेला प्रत्येक नियम, तो केल्यानंतर शक्य तितक्या लवकर, राज्य विधान मंडळाचे अधिवेशन चालू असताना, एकाच अधिवेशनास किंवा लागोपाठच्या दोन अधिवेशनास मिळून एकून तीस दिवसांचा होईल इतक्या कालावधीकरिता, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक, सभागृहापुढे ठेवण्यात येईल, आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी, त्या नियमात कोणताही फेरफार करण्यास किंवा तो नियम करण्यात येऊ नये म्हणून दोन्ही सभागृहे सहमत होतील तर अशा निर्णयाबाबतची अधिसूचना **शासकीय राजपत्रात** प्रसिध्द करण्यात आल्याच्या तारखेपासून, तो नियम केवळ अशा सुधारलेल्या स्वरुपातच अंमलात येईल किंवा, यथास्थिति, तो नियम अंमलात येणार नाही, तथापि, अशा कोणत्याही फेरफारामुळे किंवा

विलोपनामुळे त्या नियमान्वये, पूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

## निरसन व संक्रमणकालीन तरतुदी

निरसन व व्यावृती. **२३.** (१) या अधिनियमाच्या प्रारंभाच्या तारखेस लॉर्ड रे महाराष्ट्र औद्योगिक संग्रहालय अधिनियम, १९४७ हा निरसित होईल. सन १९४७ चा मुंबई ३२.

(२) पोट-कलम (१) अन्वये, लॉर्ड रे महाराष्ट्र औद्योगिक संग्रहालय अधिनियम, १९४७, निरसित करण्यात आला असला तरीही आणि कलम ६ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरीही, निरसित करण्यात आलेल्या अधिनियमान्वये रचना करण्यात आलेले मंडळ, हे, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या तारखेस या अधिनियमान्वये रचना केलेले मंडळ असल्याचे मानण्यात येईल, आणि त्याचे उक्त तारखेच्या निकटपूर्वी अधिकार पदावर असलेले सदस्य हे कलम ६ च्या तरतुदींनुसार अशा उत्तराधिकारी मंडळाची रीतसर रचना करण्यात येऊन अशा उत्तराधिकारी मंडळाची पहिली बैठक भरविण्यात येईपर्यंत, अधिकार पद धारण करण्याचे चालू ठेवतील. अशी पहिली बैठक भरवण्याच्या निकटपूर्वी, विद्यमान, सदस्य कार्यमुक्त झाल्याचे मानण्यात येईल, पण अशारीतीने सदस्य कार्यमुक्त झाल्यामुळे, ते कार्यमुक्त होण्यापूर्वी प्रोद्‌भूत झालेल्या कोणत्याही दायित्वातून त्यांच्यापैकी कोणीही मुक्त होणार नाही.

(३) निरसित अधिनियमान्वये करण्यात आलेले व या अधिनियमाच्या प्रारंभाच्या तारखेच्या निकटपूर्वी अंमलात असलेले, नियम आणि उपविधी हे, या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसतील तेथवर, या अधिनियमाच्या संबध्द तरतुदीअन्वये करण्यात आले असल्याचे मानण्यात येईल, आणि ते, तद्‌नुसार या अधिनियमान्वये करण्यात आलेल्या नियमांद्वारे किंवा उपविधीद्वारे अधिक्रमण होईपर्यंत अंमलात राहतील.

(४) या अधिनियमाच्या प्रारंभाच्या तारखेपासून :—

(अ) निरसित अधिनियमान्वये नेमण्यात आलेला आणि अशा तारखेच्या निकटपूर्वीच्या दिवशी अधिकार पद धारण करणारा परिरक्षक व इतर अधिकारी आणि कर्मचारी हे, त्या तारखेच्या निकटपूर्वी त्यांना ज्या अटी व शर्ती लागू असतील त्याच अटींवर व शर्तींवर, त्यामध्ये या अधिनियमान्वये सक्षम प्राधिकाऱ्याकडून फेरफार करण्यात येईतोपर्यंत, संचालक आणि इतर अधिकारी व कर्मचारी म्हणून नेमण्यात आले असल्याचे मानण्यात येईल ;

(ब) अशा तारखेच्या निकटपूर्वीच्या दिवशी संग्रहालयाचे सदस्य असतील अशा सर्व व्यक्ती, या अधिनियमान्वये संग्रहालयाचे तत्सम वर्गातील सदस्य झाल्याचे मानण्यात येईल.

(क) निरसित अधिनियमान्वये रचना करण्यात आलेल्या मंडळाचे सर्व हक्क, या अधिनियमान्वये मंडळाकडे निहित होतील.

(ड) निरसित अधिनियमान्वये रचना करण्यात आलेल्या मंडळाने किंवा मंडळाच्या वतीने पत्करलेली आणि या अधिनियमाच्या प्रारंभाच्या तारखेच्या निकटपूर्वी अस्तित्वात असलेली सर्व ऋणे, दायित्वे आणि आबंधने ही, मंडळाने, या अधिनियमान्वये त्यास प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करताना पत्करलेली ऋणे, दायित्वे व आबंधने असल्याचे मानण्यात येईल आणि त्यानुसार ती प्रवर्तनात असण्याचे चालू राहील.

(ई) निरसित अधिनियमान्वये रचना करण्यात आलेल्या मंडळासंबंधीच्या कोणत्याही कायद्यातील किंवा कोणत्याही संलेखातील कोणताही निर्देश हा मंडळाबाबतचा निर्देश असल्याप्रमाणे त्याचा अर्थ लावण्यात येईल आणि असा कायदा किंवा संलेख मंडळास लागू होईल.

शामुको.-एच ७५७-४,५५०-१०-२०१३

**शासकीय मुद्रणालय, कोल्हापूर**

## महाराष्ट्र शासनाची प्रकाशने मिळण्याची ठिकाणे

- **संचालक**

  शासन मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशन संचालनालय,
  महाराष्ट्र राज्य
  (प्रकाशन शाखा) नेताजी सुभाष मार्ग, मुंबई-४०० ००४.
  दूरध्वनी : (०२२) २३६३२६९३ व ३६३०६९५

- **व्यवस्थापक**

  शासकीय फोटोझिंको मुद्रणालय व ग्रंथागार
  फोटोझिंको मुद्रणालय आवार, जी. पी. ओ. नजीक,
  पुणे-४११ ००१
  दूरध्वनी : (०२०) २६१२५८०८

- **व्यवस्थापक**

  शासकीय मुद्रणालय व ग्रंथागार,
  सिव्हील लाईन्स, नागपूर-४४० ००१
  दूरध्वनी : (०७१२) २५६२६१५

- **सहा. संचालक**

  शासकीय लेखनसामग्री भांडार व ग्रंथागार, पैठण रोड,
  औरंगाबाद-४३१ ००१
  दूरध्वनी : (०२४०) २३३१५२५

- **व्यवस्थापक**

  शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार,
  ताराबाई पार्क, कोल्हापूर-४१६ ००३
  दूरध्वनी : (०२३१) २६५०४०२

आणि

## महाराष्ट्र शासनाच्या प्रकाशनाचे अधिकृत विक्रेते